

बलराज साहनी: कर्मयोगी युधिष्ठीर

बलराज साहनी यांचं खरं नाव युधिष्ठीर होतं. त्यांच्या भावाचं नाव भीष्म आणि मुलाचं परिक्षीत. ही तिनही नावं महाभारतातली आहेत. १ मे १९१३ रोजी रावळपिंडी येथे बलराजजींचा जन्म झाला. त्यांनी बी.ए.(हिंदी) आणि इंग्रजी साहित्य घेऊन एम.ए. करून रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतीनिकेतनमधल्या विद्यार्थ्यांना हिंदी आणि इंग्रजी शिकवण्याचं काम करू लागले. बीबीसीच्या हिंदी विभागात उद्घोषक म्हणूनही काही काळ काम केलं.

परफॉर्मिंग आर्ट्समध्ये रुची असलेल्या बलराज यांनी इंडियन पिपल्स थिएटर असोसिएशनच्या उभारणीत सक्रीय सहभाग दाखवला. १९४६मध्ये ख्वाजा अहमद अब्बास यांच्या *धरती के लाल*मधून त्यांनी हिंदी चित्रपटांत पदार्पण केलं आणि आपल्या आयुष्याच्या अंतापर्यंत ते अभिनेता म्हणूनच वावरले. *दो बिघा जमीन, सीमा, सोने की चिडीया, अनुराधा, काबुलीवाला, हकीकत, वक्त, तलाश, एक फूल दो माली, दो रास्ते, हंसते जख्म* आणि *गर्म हवा* यांसारख्या त्यांच्या काही भूमिका अविस्मरणीय ठरल्या.

सेटवर ते नेहमी आपल्याबरोबर एक टाईपरायटर ठेवत . त्यावर ते सतत हिंदी कथा लिहीत आणि त्यांचे बंधू भीष्म संपादित 'नई कहानी'मध्ये छापण्यासाठी पाठवून देत. देव आनंद-गीता बाली यांच्या हिट *बाझीं*चं लेखन बलराज साहनींनी केलं होतं. १९५७मध्ये *लाल बत्ती* नावाच्या एका सस्पेन्स थ्रिलरचं दिग्दर्शनही त्यांनी केलं होतं.

संयत तरीही उत्कट अभिनय हे त्यांचं वैशिष्ट्य होतं. या शैलीमुळे ते समकालीन कलाकारांपेक्षा एक वेगळीच इमेज तयार करून गेले. नायक म्हणून ते लक्षात राहिले तसे चरित्र भूमिकांतही चमकले. १९७०च्या दशकात त्यांनी चरित्र अभिनेता म्हणून नवी वाटचाल सुरू केली. त्याच वेळी त्यांचा मुलगा परिक्षित साहनी चित्रपटांत पदार्पण करत होता. त्यांची तरुण मुलगी शबनम हिच्या अकाली मृत्यूचं दुःख त्यांना अस्वस्थ करून गेलं. १३ ऑगस्ट १९७३ रोजी वयाच्या साठाव्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचं निधन झालं.

या दिग्गज अभिनेत्याच्या स्मृतीप्रित्यर्थ गेल्या आठवड्यात मुंबईच्या भवन्स कल्चरल सेंटरद्वारा 'बलराज साहनी, अतीत की यादें सुहानी' नावाचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात बलराजजींचे सुपूत्र परिक्षित साहनी, ज्येष्ठ अभिनेते ए.के. हंगल आणि गुंफी पेन्टल यांनी त्यांच्या आठवणी सांगितल्या.

परिक्षित साहनी म्हणाले, 'मी सहा वर्षं युरोपमध्ये शिकत होतो. त्यानंतर मुंबईला परतलो. माझ्या पहिल्याच सिनेमाच्या सेटवर वावरताना युरोपियन संस्कृतीचा प्रभाव असल्याने तरुण अभिनेत्रींबरोबर फ्लर्ट करू लागलो. माझ्या वडिलांच्या हे लक्षात आलं, तेव्हा ते मला एका कोपऱ्यात घेऊन गेले आणि प्रेमाने माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले, 'हे बघ बेटा, माझ्यासाठी माझा सेट हेच मंदिर-मस्जिद आहेत. काम हीच माझी प्रार्थना आणि पूजा-अर्चा आहे. हे माझं प्रार्थनास्थळ आहे, तेव्हा तुला जे काही करायचं असेल ते बाहेर जाऊन कर. या जागेचं पावित्र्य राख.'

ए.के. हंगल यांच्याशी संबंधित एक आठवणही त्यांनी सांगितली. परिक्षित साहनी म्हणाले, 'दिग्दर्शक म्हणून मला हंगलसाहेबांचा एक शॉट घ्यायचा होता. त्यात हंगलसाहेब भर उन्हात एक हातगाडी खेचत आणतात असं दृश्य होतं. रखरखत्या उन्हात रस्त्यावरचं डांबर वितळतं. हंगलसाहेबांना अनवाणी चालावं लागू नये म्हणून मी कॅमेऱ्याचा अँगल असा ठेवला की त्यांचे पाय दिसू नयेत. पण शॉट शूट करताना माझ्या लक्षात आलं की, हंगलसाहेब अनवाणीच ती गाडी ओढत होते. मी लगेच कटचे आदेश देऊन त्यांच्याकडे धावत गेलो आणि त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते माझ्यावरच उलट डाफरले. म्हणाले, 'परिक्षित, तुझ्या बापाने *दो बिघा जमीन*मध्ये कोलकात्याच्या रस्त्यावर अशीच अनवाणी पायांनी हातगाडी ओढत धावण्याचा शॉट दिला होता. तू जा, तुझं काम कर. मी असा अनवाणीच शॉट देणार.' त्या शॉटनंतर हंगल साहेबांच्या पायांना फोड आले होते.'

ए. के. हंगल यांनीही आपल्या जुन्या दोस्ताच्या आठवणी थरथरत्या आवाजात सांगितल्या. बलराजची कलाकार म्हणून कोणालाच खरी कदर करता आली नाही, ही खंत त्यांनी आपल्या बोलण्यातून पुन्हा पुन्हा व्यक्त केली. आजच्या चित्रपटांबद्दल ते म्हणाले, 'आजकल फिल्मों में जिस्म दिखाते है, आत्मा कही देखने को नही मिलती.'

अभिनेता गुंफी पेन्टल यांनीही बलराज यांच्या आठवणी सांगितल्या. या कार्यक्रमाचं संचालन अनिल जोशी यांनी केलं होतं. विशेष निमंत्रित पाहुणे आणि 'चित्रलेखा'चे संपादक भरत कापडीया यांनी 'अॅक्टिंगशिवायची अॅक्टिंग - म्हणजेच त्यांचा अभिनय हा अभिनय न वाटावा इतका सहज होता,' या शब्दांत बलराजजींना आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाचा समारोप बलराज साहनींच्या *वक्त* सिनेमातलं 'ओ मेरी जोहरा जबीं...' आणि दीपाली सोमैयाच्या आवाजात *सीमा* सिनेमाचं 'तू प्यार का सागर है...'ने झाला. खरोखरच साहनीयुग सुहानं युग ठरलं! ✶



छाया: ए. एल. सय्यद